सामना

## पंजाबी गायकाच्या घरी मोलकरणीची हातसफाई

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – पंजाबी गायकाच्या घरी मोलकरणीने हातसफाई केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी ओशिवरा पोलिसांनी मोलकरणीविरोधात गुन्हा नोंद केला आहे. तक्रारदार हे पंजाबी गायकाकडे मॅनेजर म्हणून काम करतात. त्याने ११ मे रोजी घरकामासाठी मोलकरणीला ठेवले होते. ती मोलकरीण दोन तास काम करून त्यानंतर निघून जात असायची. त्याच्या पत्नीला लग्नात भेट म्हणून सोन्याचे दागिने दिले गेले होते. तीन दिवसांपूर्वी त्याच्या पत्नीने कपाटात दागिने पाहिले होते. मात्र बुधवारी त्याच्या पत्नीला दागिने घालून कार्यालयात जायचे होते तेव्हा त्यांना दागिने कपाटात मिळून आले नाहीत. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने त्याने ओशिवरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.




## ओडिशातील ड्रग्ज माफियासह दोघे गजाआड

*ओडिशाहून* गांजा आणून तो मुंबई, ठाणे, नवी मुंबई व आजूबाजूच्या परिसरात विकणाऱ्या दोघा ड्रग्ज माफियांच्या ट्रॉम्बे पोलिसांनी मुसक्या आवळल्या. रिक्षात भरून गांजा घेऊन जात असताना त्यांना पोलिसांनी रंगेहाथ पकडत त्यांच्याकडून तब्बल २२ किलो २३० ग्रॅम वजनाचा व ४ लाख ४३ हजार किमतीचा गांजा जप्त केला.

ट्रॉम्बे बस टर्मिनल जुनी जेटी मार्गावरून दोघे ड्रग्ज माफिया एका रिक्षातून गांजाचा साठा घेऊन जाणार असल्याची खबर ट्रॉम्बे पोलिसांना मिळाली. त्यानुसार सपोनि सुशील लोंढे, उपनिरीक्षक शरद नाणेकर, मनोज ठाकूर व पथकाने सापळा रचून उत्तम साहू आणि दिनेश घाडगे यांना अटक केली.

उत्तम हा ओरिसाचा तर दिनेश ठाण्यात राहतो. दोघेही गांजा ठाणे, मुंबई, नवी मुंबईत विकतात. साहू याने ओरिसाहून हा गांजाचा साठा आणला होता. त्यानंतर तो गांजा विकण्यासाठी दोघेही घेऊन जात होते. पण तत्पूर्वीच ट्रॉम्बे पोलिसांनी त्यांच्यावर झडप घालून २२ किलो वजनाचा गांजाचा साठा जप्त केला. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

Mumbai Edition
May 30, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

ACE Scanner

# ट्रॉम्बे पोलिसांकडून परराज्यातील मुख्य गांजा पुरवठाधारक आरोपीसह एकूण दोन आरोपींना अटक

## २२ किलो गांजा हस्तगत

**रवि निषाद/मुंबई**

**मुंबई** - ट्रांबे पोलिसांकडून परराज्यातील मुख्य गांजा पूरवाठाधारक आरोपी सह एकूण दोन आरोपीला अटक करुन २२ किलो गांजा हस्तगत करण्यात आले आहे. ज्याची कीमत अंदाजे कि.रु. ४,४३,०००/- रुपये सांगण्यात येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई यानी २२ किलो गांजा सह दोन आरोपीना अटक केली आहे. सदर आरोपी विरोधात पोलिसांनी गुन्हे क्रमांक १०३/२०२५, (२६९/२०२५) कलम ८ (क),२०(बी)(ग)(सी),२९ गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत पोलिसांनी कारवाई केली. सदर कारवाई एस्सेल स्टुडिओ च्या बाजूला, इलेक्ट्रिक पोल क्रमांक ७५ जवळ, ट्रॉम्बे बस टर्मिनल, जुनी जेटी रोड, ट्रॉम्बे, मुंबई यातील आरोपी इसम यांनी ४,४३,०००/-किमतीचा एकूण २२ किलो २३० ग्रॅम वजनाचा 'गांजा 'हा अमली पदार्थ विक्री व वाहतूक करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या कब्जात बेकायदेशीर रित्या बाळगला म्हणून सदर आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेले आरोपी दिनेश शिवाजी घाडगे वय ४६ वर्ष व्यवसाय रिक्षाचालक रा.ठी.भूमी अपार्टमेंट,तिसरा मजला,रूम नंबर ३०२, टीएमटी डेपो मागे लोकमान्य नगर, वागळे इस्टेट, ठाणे आणि उत्तम रब्बी साहू वय २९ वर्ष रा.ठी. गाव रेगुनापुरा तालुका गोजाम राज्य ओरिसा असे सांगण्यात येत आहे.सदरची कारवाई अपर पोलीस आयुक्त डॉ.महेश पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ०६ श्री नवनाथ ढवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग, श्री.राजेश बाबशेट्टी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे.श्री राजेश शिंदे, पोलीस निरीक्षक विजय गरुड यांच्या मार्गदर्शना खाली ट्रॉम्बे पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथक श्री शरद नानकार व दहशतवादी विरोधी पथकाने केली आहे. नवनाथ ढम्हणवले मार्गदर्शना खाली स.पो. नि. सुशील लोंढे,पो.उप. नि.शरद नाणेकर, पो.उप. नि.मनोज ठाकूर,रमेश धुमाळ, पो.हवालदार आव्हाड, पो.हवा.आखाडे पो. हवा.लेंभे, देशमुख, माळी, वाळके आणि बाविस्कर च्या टीमनवी केली आहे.वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेश शिंदे यानी या मधे प्रमुख मार्गदर्शन केली असून उपायुक्त नवनाथ ढवळे यानी समाधान कारक कारवाईची प्रशंसा केली आहे.

PDF Scanner ACE Scanner




PDF Scanner ACE Scanner

10:50 AM 0.6KB/s 71

Share to Feed POST

**Jalal Sanjar**

Friends · + Album · + AI label off

Trombay police station is rock.

Help me write · Add emoji · Profes




INSTAGRAM

**Gaanja 22.23 Kg Worth ...**

OPEN

PDF Scanner ACE Scanner